**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**
==============================================================
**A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal**
----------------------------------------------------------------------------------------------
**Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024**
==============================================================

# संत तुकारामांचे समाजप्रबोधन

संशोधक - पंढरीनाथ हरी मोकळे मार्गदर्शक- डॉ.अनिता खंडागळे

प्रस्तावना

महाराष्ट्र ही संताची भूमी आहे. या महान भुमीत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाची स्थापना केली. ज्ञानेश्वराच्या या भागवत धर्माच्या मंदिरावर कळस चढविण्याची कामगिरी देहु च्या तुकाराम महाराजांनी केली. या संत परंपरेत अनेक थोर संत होऊन गेले. परंतु या थोर परंपरेत ज्यांनी नविन असे पायंडे पाडले ते थोर संत म्हणजे तुकाराम महाराज होय. त्यांचे जवळपास पाच हजार अभंग आज उपलब्ध आहेत. त्यातील बरेचसे अभंग समाजप्रबोधनपर आहेत. त्या समाजप्रबोधनाचा आजही समाजास बहु मोल असा उपयोग आहे. मानसाने जीवन जगताना कसे जीवन जगावे हे सांगितले आहे. त्यामध्ये जलनियोजन कसे करावे?, सहकारक्षेत्र, कृषीक्षेत्र या विषयी मार्गदर्शन. त्याचप्रमाणे धन कसे कमवावे ?, खर्च कसे करावे ? तसेच जगाविषयी तळमळ, पांडूरंगाविषयी भक्तीभाव, पर्यावरणवादी दृष्टीकोन अशा प्रकारे जीवनाच्या सर्वच अंगावर प्रकाश टकालेला आहे. सर अलेक्झांडर याने तर तुकारामांना 'विश्वकवी' म्हणून संबोधलेले आहे. भास्कर हांडे या हॉलंड चित्रकाराने चित्ररुपाने तुकारामांचे कार्य रेखाटले आहे. दिलिप चित्रे यांनी तर तुकारामांच्या अभंगांचे इंग्रजीत भाषांतर करुन तुकारामांना जागतिक पातळीवर नेण्याचे महान कार्य केले आहे. तसेच इंग्रजी भाषेत संत तुकारामांवर जागतिक दर्जाचा चित्रपट काढण्याचे काम ही आज चालू आहे. म्हणजेच संत तुकाराम हे एक विश्वसमाज सुधारक आहेत असेच म्हणावे लागेल.

अल्पपरिचय :-

संत तुकारामांचा जन्म शके 1530 म्हणजेच इ.स. 1608 मध्ये देहू या गावी झाला. त्यांचे संपुर्ण नाव तुकाराम बोल्होबा अंबिले असे असुन ते कुणबी मराठा जातीत जन्मास आले होते. पुर्वीपासून महाजनकी त्यांच्या घरात होती. ते सावकारी व वाण्याचा धंदा करित असत. सुरुवातीचे सतरा वर्षे त्यांची सुखासमाधानात गेली. परंतु वयाच्या 17 व्या वर्षापासून त्यांच्यवर संकटे येण्यास सुरुवात झाली. आई-वडिल वारले. भावजय ही वारली. त्यामुळे थोरला भाऊ सावजी विरक्त होऊन घरातुन निघुन गेला. दुकानाचे दिवाळे निघाले. दुष्काळात गुरेढोरे गेली. पहिली बायको रखमाबाई व मुलगा संतु डोळ्यादेखत अन्न-अन्न करुन मेले. संसाराची अशी वाताहत उघडया डोळयांनी तुकारामांनी पाहिली. त्यातच दुसरी पत्नी जिजाईच्या कर्कश स्वभावामुळे तुकाराम उद्विग्न झाले. आणि तुकारामांनी वैराग्याच्या सागरात उडी घेतली.

संसारात उद्विग्न झालेले तुकाराम गावाबाहेरील भंडारा डोंगरावर जाऊन बसू लागले. हळुहळु ते ईश्वर चिंतनात रमले. त्याचवेळी संत नामदेवांनी स्वप्नात येऊन त्यांना अभंग रचण्याची प्रेरणा दिली. तेंव्हा पासून तुकाराम अभंग रचना करु लागले. अशातच पुढे 23 जानेवारी 1640 रोजी त्यांना 'ओतुरास गंगावार' या स्थानी केशवचैतन्य बाबाजी कडून स्वप्नातच गुरुउपदेश होऊन 'रामकृष्ण हरी' हा मंत्र मिळाला. पुढे त्यांच्या अंभंग रचनेमुळे तत्कालीन ब्राम्हण मंडळींनी ते शुद्र असल्यामुळे त्यांना

त्रास देण्यास सुरुवात केली. मंबाजी गोसाव्याने तर त्यांना प्रत्यक्ष मारहान केली. रामेश्वर भटाने त्यांचा अभंगाचा गाथा इंद्रायनी नदीमध्ये पाण्यात फेकून दिला. तरी त्यांनी व्यक्तिगत चरित्र, भक्तिभाव, धर्मनिष्ठा यांची थोरवी सिध्द केली. म्हणूनच रामेश्वर भट्ट त्यांना शरण आला. छत्रपती शिवाजी महाराजही त्यांच्या चरणी लीन झाले.. ज्ञानेश्वरांनी स्थापन केलेल्या वारकरी मंदिराचा कळस तुकाराम महाराज झाले. शेवटी त्यांनी इ. स. 1650 साली वैकुठगमनाचा मार्ग पत्कारला.

समाजप्रबोधन :-

संत तुकारामांचे जवळपास पाच हजार अभंग उपलब्ध आहेत. त्यातील ब-याचशा अभंगातुन त्यांनी समाजास उपदेश केलेला आहे. भक्ती आणि आध्यात्मिकतेचा प्रसार करून समाजातील, असमानता जातीभेद व अंधश्रद्धा या विरोधात लढा दिला त्यांनी अभंगाद्वारे समाज सुधारणेचे आणि मानवतावादी मूल्यांचे प्रबोधन केले आहेत. त्यातील काही मोजक्याच अभंगाचा आपण विचार करु.

जोडीनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेंच करी ।।
उत्तमचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ।।

हा अभंग तर आजच्या पुढारी, अधिकारी लोकांची कानउघडणी करण्यासाखा आहे. तुकाराम महाराज सांगतात की, तुम्ही धन, कमवा पण उत्तम व्यवहाराने कमवा. आणि खर्च करतांनाही विचार करुन खर्च करा. असा बहुमोलाचा सल्ला तुकारामांनी दिलेला आहे त्याचबरोबर ते पुन्हा म्हणतात.

भिक्षापात्र अवलंबने । जळो जिणे लाजिरवाणे।।

म्हणजेच मानवाने जीवन जगतांनी मेहनत करावी, कष्ट करावे व चांगल्या मार्गाने आवश्यक तेवढे धन हे कमविलेच पाहिजे असे ते सांगतात त्यांचे अभंग वाचुन तर मन थक्क होते. पुढील काही अभंग पहा.

'बलबुध्दी वेचूनिया शक्ती । उदक चालवावे युक्ती ।।

या अभंगातुन त्यांनी चारशे वर्षापूर्वी जलनियोजन समाजास पटवून सांगितले आहे जे आम्हास अजुनही फारसे साध्य करता आलेले नाही. त्यांची किती दुरदृष्टी आहे.
आहे..

"ऐकमेका साहय करु । अवघे धरू सुपंथ।।"

म्हणजे बघा येथे सहकार क्षेत्रातले तत्वज्ञान त्यांनी मांडलेले दिसते. तसेच

" शुध्द बीजापोटीं । फळे रसाळ गोमटी।।"

येथे तर त्यांनी कृषीक्षेत्रामध्ये बी- बीयाने निवडतांना कशी काळजी घेतली पाहिजे हे सांगितलेले आहेत.

" असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे । ।

आजच्या तरुणांसाठी, विद्यार्थ्यांसाठी खूप बहुमोल उपदेश तुकारामांनी केलेला असून त्यातुन प्रयत्नांचे महत्व पटवून दिले आहे. त्याप्रमाणे संकटावर मात करुन जीवन कसे जगावे हे ते पुढील अभंगाद्वारे मांडतात.

'आले देवाजीच्या मना । तेचे कुणाचे चालेना।।'

या अभंगाद्वारे त्यांनी जीवनव्यवहार शिकविलेला आहे. त्याचप्रमाणे जनतेस झाडांचे, निसर्गाचे महत्व सांगतांना ते म्हणतात

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे। पक्षी ही सुस्वरे आळविता॥

म्हणजे किती दुरदृष्टी म्हणावी लागेल याला, ज्या वृक्षाचे महत्व आज आम्हाला कळायला लागले आहे. ते वृक्षलागवडीचे महत्व संत तुकारामांना कळले होते बरं त्याकाळी तर घनदाट वृक्षे होती. परंतु तरी सुध्दा त्यांना वृक्षांचे महत्व कळाले होते व त्यांनी तत्कालीन समाजालाही सांगितले होते.

संत तुकाराम हे एक कर्ते सुधारक होते. म्हणून ते म्हणतात.

'बुडती हे जन देखवेना डोळा ! म्हणोनी कळवला येतो आम्हा !!

असे कळकळीचे उद्गार त्यांनी काढले आहेत. त्यांना समाजाचा उध्दार करुन जीवनाच्या ख-या वाटा दाखवायच्या होत्या. तुकाराम हे स्त्री, वैश्य, शुद्रांचे प्रतिनिधी होते. म्हणून त्यांनी कर्मठांचे ढोंग, पंडितांची पोपटपंची इ.वर कडाडून टिका केली.

"दावुनी, वैराग्याच्या कळा । भोगी विषयाचा सोहळा । ।
तुका म्हणे ऐसे संत । जिते दडपावे मातीत । ।

असा समाजसुधारणेचा विचार तुकारामांच्या अभंगवाणीतुन व्यक्त होतो. म्हणजेच आज समाजामध्ये चालत असलेले साधुंचा ढोंगीपणा त्यांनी त्याकाळी समाजास सांगितला होता. म्हणजेच लोकांनी श्रध्दा ठेवावी पण अंधश्रध्दा ठेऊ नये असाच संदेश तुकारामांनी दिलेला दिसतो. तो आजही उपयोगी आहे. त्याचप्रमाणे पुढील अभंगातुन त्यांनी देशभक्तीही दाखवुन दिली आहे.

पवित्र ते कुळ पावन तो देश । जेथे हरीचे दास जन्म घेती ।।

याशिवाय तुकारामांनी देशासाठी विधायक असे कार्य केले आहे. त्यांचे पाइकाचे अभंग प्रसिध्द आहेत

कारणापे असता दुर्ष्टी | शंका पोटी उपजेना ||
शुर मिरवे रणांगणी । मरणीच संतोष ।।
त्याच प्रमाणे
'शुरा साजती हातीयारे | गांडया हांसतील पोरे ||

इ. अभंगातुन त्यांनी छत्रपतींच्या मावळयांना स्फुर्ती दिलेली दिसते. म्हणजेच एक प्रकारे त्यांनी स्वराज्याच्या कामीही मदत केलेली दिसते. तत्कालीन महाराष्ट्रातील लोकांना धर्मभिमानाबरोबर स्वामीनिष्ठा, शरीरसुखापेक्षा धर्मनितीश्रेष्ठतव, धर्मकर्मापेक्षा चित्तशुध्दी, सदाचार इ. जीवनमुल्यांची ओळख करुन दिली.

अशा प्रकारे संत तुकाराम महाराजांनी समाजप्रबोधन करुन ते एक संत, साहित्यीक, कवी, सुधारक, राष्ट्रसेवक व भक्त असल्याचे सिध्द केलेले आहे. याचा आजही समाजास बहुमोल असा उपयोग आहे. हिच आज त्यांच्या साहित्याची प्रासंगीकता आहे.

उपयोजन:-

1. आजच्या भ्रष्ट पुढारी व अधिकारी यांनी उत्तम व्यवहाराने धन कमवावे हा उपदेश घ्यावा.
2. मेहनत, कष्ठ करुन धन कमवावे पण भिक मागू नये.
3. पाण्याचे महत्व आपणास पटलेले आहे.
4. एकमेकांना नेहमी मदत करावी हा संदेश घेता येतो.
5. कृषीक्षेत्रात पेरणी करतांना बि- बीयानांची निवड कशी करावी हे समजते.
6. प्रयत्न केल्याने कुठलीच गोष्ट अशक्य नाही. हा अभ्यास करण्याचा मंत्र आजच्या विद्यार्थ्यांना संत तुकारामांनी दिलेला आहे.
7. कितीही मोठे संकट आले तरी त्यास धीराने तोंड दयावे.
8. पर्यावरणावादी दृष्टीकोन मिळतो.
9. भोंदू साधुंवर प्रखर टिका केली आणि ढोंगी साधुच्या नादी लागु नये असे सांगितले आहे.
10. देशभक्ती शिकविली ती स्वराज्याच्या कामी आली तशी आजही देशकामी यावी.

निष्कर्ष :-

1. संत तुकारामांनी समाजप्रबोधनाचे अखंड कार्ये केले.
2. भरकटलेल्या समाजास योग्य दिशा दिली.
3. संत तुकाराम कर्ते सुधारक होते. कारण त्यांनी दुष्काळी परिस्थितीत घरातील धान्य जनतेत वाटून दिले. आणि घरातील सावकारकीची गहाणखते इंद्रायनीत फेकून देऊन ख-या अर्थाने जगातील पहिली कर्जमाफी दिली..
4. पाइकांच्या अभंगाद्वारे मावळयांना गणिमी काव्याच्या खुब्या सांगुन स्वराज्यकामी मदत केली.
5. देशभक्ती व देवभक्तीचे महत्व सांगितले
6. पर्यावरणवादी दृष्टीकोन, पाणी बचतीचे महत्व, आपल्या अभंगाद्वारे जनतेस पटवून दिले.

समारोप

ज्या काळी छ. शिवाजी महाराज आपले स्वराज्य स्थापन करुन सामान्य जनतेचे रक्षण करत होते. त्याचवेळी संत तुकाराम त्यांचे वैचारिक प्रबोधन करीत होते. असे दिसते. संत तुकाराम हे एक संत, साहित्यीक, कर्तासुधारक, पांडूरंग भक्त, थोर कवी, व महान राष्ट्रसेवक होते असेच म्हणावे लागेल.

थोडक्यात ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्राला भागवतधर्माचे व्यापक तत्वज्ञान दिले. नामदेवांनी भक्तीचा ध्वज खांदयावर टाकून हा बहूमोल ठेवा उत्तर भारतापर्यंत प्रस्तुत केला, एकनाथांनी तत्व आणि व्यवहार यांचा मेळ घडवून सामाजीक नितीमत्तेची प्रतिस्थापना केली. तर तुकारामांनी भागवत धर्माची शिकवन खेडया-पाडया पर्यंत पोहोचवून भागवत धर्ममंदिरावर कळस चढविला हे सांगतांना संत बहिणाबाई म्हणतात.

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालय ।।
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले ते आवार ।।
जनार्दन एकनाथ । खांब दिसला भागवत ।।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।
बहिणी म्हणे फड़कती ध्वजा । तिरुपणा केले वोजा ।।

- संत बहिणाबाई

संदर्भ ग्रंथ

१) शेळके, मोहन, प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद
२) संपा, मालेश, स.ग. मराठी वाड्मयाचा इतिहास, खंड दुसरा महाराष्ट्र साहित्य परिषद , पुणे 1982
३) झाडे, रामचंद्र, संत तुकारामांचा साहित्यक व सांस्कृतिक जनसंवाद स्वाभिमान प्रकाशन, नागपूर
४) प्रका. भावे ह.अ. बहिणाबाईचा गाथा, वरदा प्रकाशन पुणे, चौथी आकृती -२०१३
५) Tukaram.com-23/02/2024